MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Issue-46, Vol-04, April to June 2023

Peer Reviewed International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G. Gholap

**MAH/MUL/ 03051/2012** **ISSN :2319 9318**

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**April To June 2023**
**Issue 46, Vol-04**

**Date of Publication**
**01 April 2023**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

27) A study of research attitude among the research scholars of the state....
**Namrata Singh, Dr. Anil Kumar Panda, Dr. Amitesh Kumar Singh, Raipur** ||103

28) Growth Trends in Urbanization and Slum Population in Lucknow....
**Dr. Kailash Yadav** || 108

29) संत साहित्य आणि वर्तमान
**Dr. V. N. Ingle, Malkapur- Dist- Akola** ||118

30) २१ वी सदी के प्रथम दशक के नाटको में सामाजिक आदर्श
**सौर्य भारदवाज, दरभंगा** ||121

31) सूचना का अधिकार ऐतिहासिक संदर्भ में उद्‌भव
**अभिषेक कदारे, अमरवाडा** ||126

32) मोहन राकेश की कहानियों में पारिवारिक संबंध
**डॉ. मोहम्मद इसराइल, दिल्ली** ||130

33) गुजरात के आर्थिक विकास की एक झलक
**Dr. Sudhirbhai Natavarbhai Patel, Borsad** ||134

34) शैक्षणिक ग्रंथालये आणि नविन शैक्षणिक धोरण—२०२०
**प्रा.डॉ. धनंजय गभणे, जि. भंडारा** ||136

35) बिहार के राजनीति में नीतीश कुमार का प्रभाव
**डॉ कुमार मंगलम पाण्डेय, आरा** ||139

36) सावित्रीबाई फुले (क्रांतिकारी) व फातिमा शेख (ज्ञान ज्योति) के शैक्षिक विचारों....
**डॉ. एस. हुसैन, मोनिका सैनी, अलवर, राजस्थान** ||142

37) शिक्षा में ई—लर्निंग की भूमिका वर्तमान परिप्रेक्ष्य में
**डॉ. नीरज तिवारी, प्रदीप कुमार, अलवर, राजस्थान** ||147

38) An Assessment of Millennium Development Goals: .....
**Dr. Ketankumar S.Bhosale, Mumbai** ||153

39) Orphans of India: A Socio-Psychological Analysis
**Prof. Archana Singh, Apurwa Mishra, Gorakhpur** ||158

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

29

# संत साहित्य आणि वर्तमान

**Dr. V. N. Ingle**
Malkapur- Dist- Akola

***********

माणूस ज्या सामाजिक पर्यावरणामध्ये जन्माला येतो ते पर्यावरण माणसाच्या जीवनाचे संकेत निश्चित करीत असते. संकेतांना नाकारण्याचा प्रयत्न तो जरी करीत असला तरी, अभिषेक होत नाही. संकेतांच्या संदर्भात स्वत:च्या मनामध्ये निर्माण झालेला अस्थिरपणा दूर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य जर कोणी करत असेल तर तो म्हणजे संतांनी केलेला सामान्यांवरील संस्कार होय. महाराष्ट्र ही संतांच्या विचाराने भक्कम झालेली भूमी आहे. या भूमिमध्ये अनेक संत महात्म्यांच्या संस्कारांच्या पाऊलखुणा जागजागी उमटलेल्या दिसून येतात. उदाहरणच घ्यायचं झाल्यास आपणास थेट १२ व्या शतकापासून ते संत गाडगेबाबा पर्यंत घेता येईल. यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सावतामाळी, संत गोरा कुंभार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा इत्यादी अनेक संतांचे दाखले आपणास सहज घेता येतील. वेगवेगळ्या जाती धर्मातून आलेल्या संतांच्या संस्कारामध ये समग्र समाजातील लोकांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य होते. बाराव्या शतकातील परिस्थिती लक्षात घेतली, तर आपणास असे दिसून येते की, सर्वमान्य माणसांना स्वत:च्या विवंचने मधून मुक्त करणे आणि त्यांच्या जीवनातील खऱ्या सौंदर्याची त्यांना जाणीव करून देणे, हे सर्वात महत्त्वाचे तत्व तत्कालीन कालखंडाने असलेले आपणास पाहायला मिळते. जो कालखंड स्वकर्तृत्व आणि परिश्रमाने मोठे झालेल्या संत महंतांना छळत होता त्या कालखंडामध्ये सर्वसामान्य माणसांची काय अवस्था असेल हे वेगळे सांगण्याची गरज पडत नाही. च्या कालखंडामध्ये सर्वसामान्य माणसांना एक वेगळा आधार देण्याचे काम संतांनी आपल्या विचारांच्या, अभंगांच्या, भारुडांच्या माध्यमातून केलं. हे महत्त्वाचं.

वारकरी संप्रदायाचा विचार करत असताना त्यामध्ये संत ज्ञानेश्वरांचा आग्रहाने विचार करावा लागतो. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' हा मराठी साहित्यालाच नव्हे तर अखंड विश्वाला दिलेला महान ग्रंथ होय. प्रत्येक कालखंड ज्ञानेश्वरीच्या रूपाने समृद्ध झालेला आपणास आजही पाहायला मिळतो. त्याचे नवेपण प्रत्येक कालखंडामध्ये स्पष्टपणे जाणवते. एकप्रकारे आपणास असे म्हणता येईल की, प्रत्येक पिढी हा संस्काराचा ठेवा दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा इमाने इतबारे प्रयत्न करताना दिसून येते. एक प्रकारे प्रत्येक माणसाकडून ही सहज घडणारी प्रक्रिया आहे. कोणताही कालखंड हा निकोप होता असे आपणास ठामपणे म्हणता येणार नाही. त्याच्या म्हणून काही समस्या, काही अडचणी, काही प्रश्न होते त्या त्या प्रश्नांना सोडवण्यासाठी प्रत्येक माणूस धडपडत होता. परंतु त्याच्या प्रयत्नांना यश मिळत होतेच असे नाही. तरी त्याची धडपड सुरू होती. या सर्व सामान्य माणसांच्या या धडपडीला त्यांच्या ध्येयापर्यंत नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संतांनी केलं, ते आपल्या विचारांच्या माध्यमातून. 'पसायदान' त्याचे उत्तम उदाहरण आहे. आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यद्ये तोषावे, तोशोनी मज द्यावे, पसायदान हे, जे खळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो, भुता परस्परे जडो मैत्र जीवाचे, दुरितांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्य पाहो, जो जे वांशील तो ते लाहो प्राणीजात 'संत ज्ञानेश्वरांचा' विचार हा महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून अखिल विश्वाचा विचार करतो. एकंदरीत सर्व मानव समूहाला आनंदाने जीवन जगता यावे, यासाठी संतांनी प्रसंगी स्वत:च्या संसाराकडे दुर्लक्ष करून इतरांचे संसार संपन्न करण्याचा प्रयत्न केला.

संत ज्ञानेश्वरांच्या बरोबरीने संत परंपरेमध्ये सर्वात महत्त्वाचे नाव जर कोणत्या संताचे घेतले जात असेल तर, ते संत नामदेव यांचे. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर समकालीन होते त्यामुळे त्यांच्या समोर असणारा समाज, त्या समाजाची सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक,परिस्थिती सारखीच होती. याची जाणीव संतांना होती. त्यामुळे संतांना माणसांच्या मनापर्यंत थेट

जाता आले व त्यांचे मन उलगडता आले. संत नामदेवांनी भागवत धर्माची पताका थेट पंजाबपर्यंत नेऊन पोहोचवली. संत नामदेवांना ८० वर्षाचे आयुष्य लाभले. या आयुष्यामध्ये त्यांनी सातत्याने भागवत धर्माचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्य माणसांना एका छत्राखाली आणण्याचा प्रयत्न संत नामदेवांनी केला. कुणाच्याही मनामध्ये आप परभाव राहू नये, श्रेष्ठ कनिष्ठत्व राहू नये, यासाठी संत नामदेव आपल्या अभंगांच्या माध्यमातून सामान्य माणसांपर्यंत गेले. त्याला समजून घेण्याचा प्रयत्न केला. संत नामदेव हे गृहस्थाश्रमी होते. त्यामुळे गृहस्थी जीवन जगणाऱ्या माणसांच्या संवेदना आपल्या अभंगांमध्ये नेमक्या टिपण्याचा प्रयत्न संत नामदेवांनी केला. संत नामदेवांचे अभंगांचा विचार करीत असताना जीवनाचे वास्तव चित्र ते मांडताना आपल्याला दिसतात. त्यासाठीची त्यांची धडपड कमालीची आहे. माणसाच्या जन्मात आल्यानंतर काहीतरी चांगले करून गेलो पाहिजे ही ही तळमळ त्यांची जागजागी दिसून येते. शेवटिली पाळी तेव्हा मनुष्यजन्म, चुकलीया वर्म फेरा पडे, एक जन्मी ओळखी करा आत्मारामा, संसार सुगम भोगू नका, संसारी असावे असुनी नसावे कीर्तन करावे वेळोवेळा, नामा म्हणे विठो भक्ताचीये द्वारी, घेऊनींया करी सुदर्शन श सर्वसामान्य माणसांना स्वतःचा उद्धार करून घेण्याचा एक साधा आणि सरळ सोपा मार्ग संत नामदेवांनी वरील उक्तींच्या माध्यमातून स्पष्ट केलेला आहे. वैषयिक आनंद हा सर्व सामान्य माणसाचा सर्वात महत्त्वाचा दुखता भाग असतो. त्यामध्ये रमत जाने हे त्याला महत्त्वाचे वाटत असते. आणि नेमके यामधूनच त्याला दूर करून, जीवनाचं खरं सौंदर्य दाखवण्याचे काम संस्कारांच्या माध्यमातून होत आलेलं आहे.

संत परंपरेतील दुसरे महत्त्वाचे संत म्हणजे संत तुकाराम हे आहेत. संत तुकाराम हे सतराव्या शतकातील एक महत्त्वाचे वारकरी संत होते त्यांचा जन्म देहू या गावामध्ये झाला. त्यांनी सर्व सामान्य माणसांना ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखविला. असे असले तरी संत तुकाराम हे वास्तववादी, समाजातील दंभावर रोखठोकपणे प्रहार करणारे संत होते. सर्वसामान्य माणसाचे होणारे आर्थिक आणि शारीरिक शोषण त्यांनी त्यांच्या काव्याचा विषय होतो. आपल्या समाजामध्ये निर्माण झालेली विषमता आणि त्यामुळे पोळला जाणारा सर्वसामान्य माणूस संत तुकारामांचे चिंतनाचा विषय होता. त्यामुळे तुकारामाचे अभंग हे प्रसंगी मृदू आणि प्रसंगी कठोर होताना आपल्याला पाहायला मिळतात. एक अभ्यासाक या नात्याने आपण संत तुकारामांच्या अभंगांचे विचार करीत असताना असे जाणवते की, संत साहित्यामध्ये विद्रोहाचा उद्गार जर कोणी व्यक्त केला असेल तर तो संत तुकारामांनी. जात्याभिमानाने उन्नत झालेल्या माणसांना त्यांनी वास्तवाची जाणीव करून दिली. जन्माला आलेला प्रत्येक माणूस हा निसर्गतः समान आहे त्यामुळे कोणालाही कोणाच्या जाती धर्माच्या माध्यमातून हिनवणे योग्य नाही याची आवर्जून दखल तुकाराम आपल्या अभंगांमध्ये घेताना दिसतात. संत तुकाराम महाराज हे संसारी असूनही परमार्थकडे वळले. जगामध्ये शांती निर्माण व्हावी ही संत तुकारामांची भूमिका होती. रडते हे जन देखवे ना डोळा म्हणून कळवळा येत असे या न्यायाने जीवन जगणारा संत वेळेप्रसंगी भले तरी देऊ कासेची लांगोटी नाठाळाचे माथे हाणू काठी श हा संत तुकारामांचा स्वभाव होता. याच स्वभावाने त्यांनी अनेक लोकांना कर्जामधून मुक्त केले. कर्जामध्ये अडकलेला माणूस हा आपलं नैसर्गिक जीवन जगू शकत नाही. त्याला वेळोवेळीआपल्यावर असलेल्या कर्जाची आठवण होत राहते व त्यातच गुंतून पडतो व जीवनाचा खरा आनंद गमावून बसतो. एका अर्थाने तुकोबांचे अभंग त्याच्या समस्येचे निरसन करतात, व त्याला आपला स्वाभाविक बाणा जपायला मदत करतात.

आधुनिक कालखंडातील विज्ञानवादी संत म्हणून गाडगेबाबा यांचे नाव सर्वश्रुत आहे. गाडगे बाबा ज्या समाजामध्ये जन्माला आले त्या समाजामध्ये कमालीचे अंधश्रद्ध जीवन होते. वेगवेगळ्या चुकीच्या परंपरा या परीट समाजामध्ये होत्या. पोटासाठी श्रम करणे आणि जगणे हा एक मात्र नियम समाजातील लोकांच्या समोर होता. आणि त्या न्यायाने समाजातील प्रत्येक माणूस आपले जीवन जगत होता. शिक्षणाचा कमालीचा अभाव या समाजात होता. अशा समाजात जन्माला येऊन गाडगेबाबा यांनी समाजातील वाईट गोष्टींचा

बिमोड करण्याच्या दृष्टिकोनातून नव्या प्रवासाला सुरुवात केली. ज्या समाजात आपण जन्मतो जगतो त्या समाजाचे आपण काही देणे लागतो हा मूलमंत्र गाडगेबाबांनी प्रत्येकाच्या मनामध्ये बिंबविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी घरदार सोडून त्यांनी समाज प्रबोधनाला सुरुवात केली. जातीप्रथा, शिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता या संदर्भात गाडगेबाबांनी वेगवेगळ्या संदर्भाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यामध्ये निर्माण झालेली घाण आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून निपटून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांचे कीर्तनाळा लोकांचा मिळणारा प्रतिसाद हा उदंड होता. साध्या सोप्या भाषेमधून लोकांना प्रश्न करून त्यांच्याकडूनच त्याची उत्तरे घेण्याचा एक वेगळा प्रयोग कीर्तनाच्या माध्यमातून होत गेला. व गाडगेबाबा घराघरापर्यंत पोचले. व्यसनाधीनता माणसाला संपवून टाकते त्याहीपेक्षा न शिकलेली माणसं ही हमाला सारखी काम करीत राहतात म्हणून आपल्या लेकरांना शिक्षण द्या. कमी किमतीचे कपडे घ्या,ताटवाठी मोडा पण आपल्या लेकरांना शिक्षण दिले वाचून सोडू नका हा मोलाचा संदेश गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना दिला. विद्या मोठे धन आहे हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा विचार समाजासमोर मांडला. या देशाची घटना लिहिली त्यांची ही फार मोठी कामगिरी आहे.हे सातत्याने ते लोकांना सांगत असत. उद्देश एकच की गोरगरिबांनी शिक्षण घेतले पाहिजे. मोठे झाले पाहिजे. व समाजाच्या प्रगतीसाठी झटले पाहिजे. नव्या पिढीच्या माध्यमातून एक नवी परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न गाडगेबाबांनी आपल्या हयात भर केला. माझ्या समोर एक नवा आदर्श निर्माण केला.

जागतिकीकरणाच्या वातावरणामध्ये स्वत:च्या बुद्धीच्या, प्रतिभेच्या जोरावर उड्या मारणाऱ्या माणसाला माणूस ओळखता येत नाही, ही खंत सातत्याने संत साहित्याचा अभ्यास करीत असताना वाटत राहते. सामाजिक जीवनामध्ये माणसाने मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती केली, याबद्दल दुमत असल्याचे कुठलेही एक कारण नाही. पण मन शांती तो तेवढ्याच गतीने हरवून बसला आहे हे वास्तव नाकारता येत नाही. त्यामुळे त्याला आजच्या पर्यावरणामध्ये निकोप जीवन जगण्यासाठी संतांच्या विचारांची आवश्यकता भासत आहे. त्यामुळेच बाराव्या शतकापासून ते आज पर्यंत सलग संतांचे अभंग, संतांच्या ओव्या, संतांची भारुड, संतांची कीर्तन वाचली जातात. ऐकली जातात. यातच संतांच्या विचारांचे, संस्कारांचे सामर्थ्य दडलेले आहे असे म्हणावे लागते.

**निष्कर्ष :**

१. मानवता हा महत्त्वाचा उद्‌गार संतांच्या अभंगांमधून व्यक्त होतो.

२. समाजात निर्माण झालेली जातीयता हा चिंतनाचा विषय संतांचा होता.

३. समाजातील सर्व सामान्य माणसाचे शोषण होऊ नये ही भावना व्यक्त होते.

४. समाजातील व्यंगावर परखडपणे भाष्य करताना तुकोबांचे अभंग पाहायला मिळतात.

५. समाज परिवर्तन आणि सामाजिक बांधिलकी हा महत्त्वाचा संदेश संतांच्या साहित्यामधून व्यक्त होतो.

**संदर्भ :**

१. विद्रोही तुकाराम : डॉ. आ. ह. साळुंखे

२. संत साहित्य संदर्भ कोश : डॉ. मु. श्री. कानडे

३. संत साहित्य आणि समाज प्रबोधन : वि. श. चौगुले

४. आधुनिक संत आणि समाज : रवींद्र गोळे

५. संत साहित्यातील सामाजिकता : डॉ. तानाजी राऊ पाटील

❑❑❑

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

March -23

(CDIII) 403




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor – (SJIF) –8.632 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## March -2023

ISSUE No - (CDIII) 403

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Dinesh W.Nichit**
Editor
Principal,
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Dr.Sanjay J. Kothari**
Executive-Editors
Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 18 | बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे उभरते राजकीय नेतृत्व महेन्द्र देवरावजी भलमे | 76 |
| 19 | वैदर्भीय ग्रामीण कादंबरी : एक वास्तव विजया विनायकराव वानखेडे | 79 |
| 20 | राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक स्वातंत्र्य यातील प्राधान्यक्रमामध्ये असलेल्या ब्रिटीशकालीन वैचारिक संघर्षाचे विश्लेषण डॉ. अशोक जाधव | 84 |
| 21 | कोविड-19 महामारीमध्ये ग्रंथालय उपक्रम डॉ. सुखलाल राठोड | 88 |
| 22 | भारतीय बँकिंग क्षेत्र — आव्हाने व संधी डॉ. गजानन सोमकूंवर | 92 |
| 23 | छत्रपती संभाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण : एक अभ्यास प्रा.डॉ.साईनाथ शेटोड | 97 |
| 24 | भारतीय अर्थव्यवस्थेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान प्रा. निलेश अरूण दूर्गे | 101 |
| 25 | महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प 2023 : कृषी विकासातून समृद्धीकडे डॉ सुनिता कलाखे, | 105 |
| 26 | शेरशहाच्या शासन व्यवस्थेचे मुल्यमापन प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 110 |
| 27 | ऑनलाइन व्यापार व त्याचे त्याचे परिणाम प्रा. डॉ. जयंत पोरे | 114 |
| 28 | कृषि पर्यटन में अपार संभावनाएं डॉ. एम.आर. दातीर | 117 |
| 29 | ग. दि. माडगूळकरांचा सिध्दहस्त लेखनीचा सौंदर्यात्सव : 'चैत्रबन' प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 122 |
| 30 | प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्याची प्रेरणा सहा.प्रा.दीपक स.वानखडे | 126 |
| 31 | कोविड-19 महामारीमध्ये ग्रंथालय उपक्रम डॉ. राठोड सुखलाल शामराव | 130 |
| 32 | कुसुमाग्रजांच्या कवितेचा अन्वयार्थ प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे | 134 |
| 33 | **कृषी उत्पन्न आणि उर्जा स्त्रोत डॉ.अर्चना शिवाजी वाघमारे,डॉ.राम प्र.ताटे** | 137 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाअस्पृश्यता विषयक विचार व कार्य प्रा. मनोहर शामराव वागतकर | 139 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDIII) 403
ISSN : 2278-9308
March, 2023

# कुसुमाग्रजांच्या कवितेचा अन्वयार्थ

प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे
ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव.

**वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज हे मराठीतील महत्त्वपूर्ण कवी आहेत.**

कुसुमाग्रजांच्या काव्याच्या कालखंड हा स्वातंत्र्यपूर्व आहे या कालखंडातील तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील वेगवेगळया प्रवृत्तींचा अभ्यास, चिंतन, जाणीवा त्यांची कविता मांडत जाते. त्या कालखंडामध्ये वावरणारा एकंदरीत समाज व त्या समाजातील वेगवेगळया अडचणी, समस्या, प्रश्न कुसुमाग्रजांच्या संवेदनेतून सुटत नाहीत. कुसुमाग्रज मराठी साहित्याला एक कवी म्हणून जरी परिचित असले तरी, त्यांना एका वाङ्मय प्रकारापुरते मर्यादित करता येणार नाही. त्यांनी नाटक,कादंबरी,कथा, लघुनिबंध इत्यादी प्रकार अत्यंत सूक्ष्म रीतीने हाताळले आहेत. असे बहुआयामी व्यक्तिमत्व असले तरीही कुसुमाग्रजांना एक ओळख प्राप्त झाली ती त्यांच्या कवितेच्या माध्यमातून. त्यांचा विशाखा हा काव्यसंग्रह त्यांना यशो शिखरावर घेऊन जाण्यात महत्त्वाचा ठरला. विशाखा या काव्यसंग्रहातील काव्य विश्व हे बहुविध आहे. कुठे एका विषयामध्ये कुसुमाग्रजांची कविता गुंतून पडत नाही तर वेगवेगळया विषयांचे बारकावे ती शोधत जाते. व इच्छित ध्येय गाठते. कुसुमाग्रजांच्या प्रतिमा आणि त्यांची भाषा ही सहज उलगडत जाणारी असून वाचकांना खेळवून ठेवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. कुसुमाग्रजांची कविता ही प्रेमाचा आलेख जसा निर्माण करते अगदी तसाच ती राष्ट्रविषयक विषयांच्या कवितांच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम स्पष्ट करते. राष्ट्र, प्रेम, निसर्ग,समाज या सर्वांचा उद्गार ती व्यक्त करते.

'अहीनकुल, हिमलाट आणि आगगाडी आणि जमिन ' या तिन्ही कवितांचे चेहरे वेगवेगळे आहेत. असेअसले तरीही त्यातून अभिव्यक्त होणारा अर्थ हा सामाजिक अस्वस्थतेचा आणि आर्थिक शारीरिक मानसिक आणि बौद्धिक विषमतेचा एक वेगळा विचार व्यक्त करतो. कुसुमाग्रज कवितांमधून वेगवेगळया प्रवृत्तींचा विचार सातत्याने मांडत जातात. एका अर्थाने विचार केला तर सर्वसामान्य माणसांचा एक प्रतिनिधी म्हणूनच उद्गार व्यक्त करताना कुसुमाग्रजांची कविता दिसून येते. आयुष्याच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर योग्य मार्गदर्शन आणि त्या मार्गदर्शनाची आशावादामध्ये होणारी परिणती या दोघाचा एक वेगळा समन्वय कुसुमाग्रजांची कविता व्यक्त करताना दिसून येते. अनुकूल मधील नकुल हिमलाट मधील सर्व समान माणूस आणि आघाडी आणि जमीन मधील जमीन या प्रार्थनेतिक संवेदना समाजाच्या एका नेमक्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचतात. त्या टप्प्यावर आपलं जीवन आहे त्या अवस्थेमध्ये केवळ व्यतीत करणारा माणूस नाउमेद झालेला जेव्हा कुसुमाग्रजांच्या कवितेचे लक्ष होतो, तेव्हा त्याच्या जीवनाला आशावादाचे नवे धुमारे फुटू लागतात. कुसुमाग्रजांच्या अहीनकुल या कवितेमध्ये सुरुवातीला सर्व काही ठीक आहे, असे वाटत असले, तरीसुद्धा ही कविता जसजशी पूर्णत्वाकडे जात राहते, तशी ती वैश्विक रूप प्राप्त करते. मानवता हा महत्वपूर्ण बाणा कुसुमाग्रजांच्या या कवितेचा आहे.

> ' कधी लवचिक पाते खड.गाचे लवलवते
> कधी वज्र धरेवर गगनातून कडकडते
> कधी गर्भ रेशमी पोत मध्ये जरतार
> प्रमदेचे मादक वस्त्र जणू सळसळते. '

एकाच वेळेस सौंदर्य आणि भयानकता कुसुमाग्रजांच्या अहिन कुल या कवितेची प्रचिती आणून देतात. या कवितेतील अहि हा सुंदर आहे देखणा आहे परंतु अमानुष आहे. त्याचं दिसणार सौंदर्य हे विषारी आहे. त्याच्या अत्याचाराला सीमा नाही ते अमर्याद आहे. तो अन्याय करणार आहे. त्याचा मुकाबला काही एकट्या फुलविली करू शकणार नाहीत. त्यासाठी हवाय उदंड आत्मविश्वास तो त्यांच्यामध्ये नाही. म्हणून तो अहि समग्र वातावरण विषारी करत मोठ्या एठदारपणे जात राहणार.आहे. जोपर्यंत त्याचा बंदोबस्त करणारा त्याच्यासमोर येऊन उभा ठाकत नाही तोपर्यंत. कुसुमाग्रज त्याच्या सौंदर्याचे केवळ वर्णन करून थांबत नाही तर, तर नकूलाच्या माध्यमातून एक नवा आशावाद सजीवांमध्ये पेरत जातात. नकुल हा उद्दाम नाही. गर्विष्ठ नाही. संधी साधू आणि श्रेय लाटणारा नाही. कदाचित सामाजिक नेतृत्वाची एक कल्पनाच कुसुमाग्रजांनी नकूलाच्या माध्यमातून केली असावी ते म्हणतात,

'हा थांब कुणाची जाळीमध्ये चाहूल
अंगार कणापरी नयन कुणाचे लाल
आरक्त ओठ ते ध्वज जणू रक्ताच्या
रे नकुल आला आला देख नकुल.'

आपल्या धुंदीत साऱ्या वातावरणाला कमी लेखणाऱ्या नागाला आपल्या मरणाची गंधवार्ता येते, आणि तो स्वतःला वाचविण्यासाठी सज्ज होतो. शब्दशः या कवितेतील अहि आणि नकूलाच्या प्रतिमांना आपण बघितले तर, नैसर्गिक पातळीवरील पारंपरिक वैरत्व आपणास पाहायला मिळते. साप आणि मुंगूस यांचे शत्रुत्व हे सर्वश्रुतच आहे. पण कुसुमाग्रज त्यातून जो सामाजिक आढावा घेतात ते महत्त्वाचे आहे या कवितेच्या शेवटी कुसुमाग्रज म्हणतात की,

'क्षणि धुळीत गेली वाहत ती विषधार
शतखंडित झाले ते गर्वन्नत उर
विच्छीन्न तनुतुनी उपुसूनी काढुनी दात
वाऱ्या परि गेला नकुल वनातून दूर.'

सत्य असत्य, नीति अनीती, मानवता आणि अमानुष्यता यांचा चाललेला संघर्ष अखेर संपतो,आणि विजय हा सत्याचा, नीतीचा, आणि मानवतेचा होतो हे सर्व झाल्यानंतर उर बडवून विजयाचे श्रेय लाटण्याचे प्रयत्न नपुलाकडून होत नाही. हे सर्वात महत्त्वाचे. समाज निर्मितीचे हे चित्र कवी बांधिलकीच्या अंगाने निर्माण करतो.

'हिमलाट' ही कुसुमाग्रजांची अत्यंत महत्त्वाची कविता आहे. समाजामध्ये सातत्याने घडून येत असणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे चित्र त्यांची ही कविता उभी करते. सामाजिक जीवन जगत असताना समाजात दोन स्तर दिसून येतात ते म्हणजे गरीब आणि श्रीमंत यांच्यामध्ये चाललेला संघर्ष कुसुमाग्रज या कवितेच्या माध्यमातून उभा करतात.

'हिमलाट पहाटे पहा जगावर आली
श्रीमंत महाली तिथे हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावून पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कणकाचा भयशाली.'

शोषक आणि शोषित यांचा संघर्ष हा सनातन आहे. कामगार आणि भांडवलदार या रूपाने तो सातत्याने व्यक्त होतो. एका बाजूला झोपड्या तर दुसऱ्या बाजूला टोलेजंग इमारती आहेत. यामध्ये ऐश आरामी जीवन जगणारी माणसे आहेत. माणूस हा नैसर्गिक दृष्ट्या एकसारखा असला तरी, त्याच्या राहणीमानामध्ये असणारा मोठा फरक कुसुमाग्रज दाखवितात. या फरकामागे असणारा त्यांचा आर्थिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. जोपर्यंत सर्वांचा विचार आर्थिक दृष्टिकोनातून समानतेच्या अंगाने होणार नाही, तोपर्यंत समाजामध्ये संघर्ष हा होत राहील याची जाणीव कुसुमाग्रजांची कविता व्यक्त करते. समाजात निर्माण झालेला असमतोल नष्ट करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे लागतील याची जाणीव ही कुसुमाग्रज सर्वसामान्य माणसांना करून देण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. त्यासाठीचे एक आवाहन ते करतात,

'ज्योतीतून धावत या तेजःकण सारे
या यज्ञातील अन सरणातील निखारे
अरे ढाळ नभा तव ते ज्वाला मय तारे
पेटवू वा वणवा कणाकणात मशाली
हिमालाट पहाटे पहा जगावं आली.'

हिमलाट ही कुसुमाग्रजांची एक सामाजिक वळणाची कविता आहे. जुने आणि नवे मूल्य यांचा संघर्ष समाजात पाहायला मिळतो. नवे मूल्य आपण स्वीकारले पाहिजेत, यासाठीची एक परिस्थिती तयार करण्यासाठीची मानसिकता या कवितेमधून व्यक्त होताना दिसून येते. सर्व एकत्र आलो तर, या हिमलाटेचा प्रतिकार आपणास सहज करता येईल, यासाठी कुसुमाग्रज सर्वसामान्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहताना दिसून येतात.

हिमलाट ही कविता जशी वेगळया चेहऱ्याने अवतीर्ण होते, अगदी वेगळा चेहरा घेऊन आगगाडी आणि जमीन ही कुसुमाग्रजांची कविता प्रतीकात्मक स्वरूपामध्ये मानवतावादाचे चित्र रंगवताना दिसून येते. या कवितेमध्ये दोन प्रवृत्ती प्रकर्षाने दिसून येतात. पहिली सुष्ट आणि दुसरी दुष्ट. दुष्ट प्रवृत्तीची मांडणी करीत असतानाच, तिची क्षणिकता आणि सुष्ट प्रवृत्तीची अमर्यादता ते सांगत जातात. जमिनीची उदारता हे तिचे दुबळेपण नाही याची जाणीव कुसुमाग्रज या कवितेमध्ये करून देतात. गाडी ही जुनून करणाऱ्या तर जमीन ही सहन करणाऱ्या शक्तीचे प्रतीक म्हणून त्यातील संघर्ष नाट्यमयरित्या चित्रीत करीत जाताना कुसुमाग्रज दिसतात. ते आपल्या कवितेमध्ये म्हणतात की,

' नको ग नको ग आक्रंदे जमीन
पायाशी लोळत विणवी नमुना
दुबळे अशीच खुशाल ओरड
जगावे जगात कशाला भेकड!
दुर्बळ भेकड त्वेषाने पुकारी
घुमले पहाड घुमल्या कपारी
उलटी पालटी होऊन गाडी ती
हजार शकले पडली खालती. '

आपल्या ठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याचे उदाम प्रदर्शन नाही तर नम्रपणा हा स्वभाव जमिनीचा आहे त्यामुळे आघाडीला विनंती आहे परंतु आगगाडीकडूनच त्याचा चुकीचा अर्थ काढला जातो व मुद्दामपणे ती आपल्याच तोऱ्यात दावत सुटते. उद्दामता हे सर्वनाशाचे कारण आहे याची जाणीव कुसुमाग्रजांची कविता करून देते. शोषितांना आपल्या ठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याची जेव्हा जाणीव होते तेव्हा समाजामध्ये परिवर्तन हे निश्चित असते. आगगाडी आणि जमीन हे जीवनाचे दोन वेगवेगळे अंग आहेट. यातील कुठल्याही अंगाचा अव्हेर होता कामा नये, याची दक्षता समाजातील समंजस प्रवृत्तीला घ्यावा लागतो. कुसुमाग्रजांची कविता प्रतिमांमध्ये बोलत असली तरी साधेपणा हे तिचे सामर्थ्य आहे. हेच सामर्थ्य वाचकांना खिळवून ठेवते.

संदर्भ :

१. विशाखा : कुसुमाग्रज
२. कुसुमाग्रजांचा सामाजिक साहित्य विचार : डॉ. देवानंद सोनटक्के
३. कुसुमाग्रज/शिरवाडकर : डॉ. द. दि. पुंडे